2019-20

I N T E R N A T I O N A L R E S E A R C H F E L L O W S A S S O C I A T I O N

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

May-2019

Special Issue No. 188 (B)

Chief Editor -
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

Executive Editors :
Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)
Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)
Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)
Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)

Dr. Ujjwala S. Deore
" नाशिक जिल्ह्यातील १९५० ते १९६० या कालखंडातील कवी.
(2019-2020)

This Journal is indexed in :
- University Grants Commission (UGC)
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmoc Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
Special Issue No.188 (B)
ISSN : 2348-7143
May- 2019

## अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक | लेखक/ लेखिका | पृष्ठ क्र.. |
|---|---|---|---|
| 1 | स्त्री शिक्षण व मानवी हक्क - यावल तालुक्याचा क्षेत्रीय अभ्यास | डॉ. अशोक खाचणे | 05 |
| 2 | गिरीश कर्नाड यांची नाट्यसृष्टी | डॉ. वर्षा गायकवाड | 09 |
| 3 | राजन गवस यांच्या हुंदका या कवितासंग्रहातील कृषिजन संस्कृतीचे वास्तव | डॉ.दिपक बावस्कर | 18 |
| 4 | जादूटोणा विरोधी कायद्याबाबत सामाजिक जाणीव जागृती : एक सामाजशास्त्रीय अध्ययन | डॉ.बंडू जामनिक | 31 |
| 5 | जालना जिल्ह्यातील वस्ती व साक्षरता यांचे वितरण : एक भौगोलिक अध्ययन | डॉ. विजय केंदळे | 35 |
| 6 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्त्री मुक्ती व हक्काची विचार धारा | प्रा. विठ्ठल साळुंके | 41 |
| 7 | नैसर्गिक आपत्ती आणि शेती व्यवसाय - एक विशेष अभ्यास | प्रा. दत्तू टाकोळे | 45 |
| 8 | सामाजिक संशोधन आणि अर्थशास्त्रीय संशोधन पद्धती - एक अभ्यास | डॉ.सुरेश ढाके | 50 |
| 9 | राईट टू पी | डॉ. सुनंदा देशपांडे | 55 |
| 10 | उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या मानसिक स्वास्थ्याचा त्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम - एक अभ्यास | प्रिती डांगे व डॉ. एम.एन. खताळ | 58 |
| 11 | महिला आयोगाची महिलांच्या हक्काच्या संरक्षणातील भूमिका | डॉ. दिलीपसिंह निकुंभ | 66 |
| 12 | भारतातील भिल्ल जमात : एक अभ्यास | प्रा.विनोद नाईक आणि डॉ. अनिल सोनवणे | 71 |
| 13 | इतवा मुंडाने लढाई जिंकली : आदिवासी कथेतील व्यक्तीचित्रण | विनोद भालेराव | 76 |
| 14 | महानुभावीय गार्तीग्रंथातील 'ज्ञानप्रबोध': स्वरूप आणि व्याप्ती | डॉ.प्रमोद गारोडे | 80 |
| 15 | भारतीय लोकसाहित्याचा उगम व प्रेरणास्थान याचा शोध | प्रा. भीमराव पांडवे | 85 |
| 16 | नाशिक जिल्ह्यातील १९४७ ते १९६० या कालखंडातील कवी | प्राचार्या डॉ. उज्वला देवरे व प्रा. संतोष कन्नोर | 92 |
| 17 | महात्मा गांधीजींचे धर्म आणि राजकारणासंबंधी विचार | डॉ. शाम कदम | 96 |
| 18 | कविता महाजन यांची कविता | डॉ. पद्मरेखा धनकर | 100 |
| 19 | मातीगळ | डॉ. संजय वाघमारे | 105 |
| 20 | महाराष्ट्रातील प्रमुख चळवळीतील महिलांचा सहभाग | प्रा. जे. के. ससाणे | 109 |
| 21 | कृषी जीवनातील लोकतत्त्वे व लोकविधी | डॉ.प्रमोद गारोडे | 112 |
| 22 | राज्यस्तरीय तिरंदाजी स्पर्धेमधील रिकर्व्ह राऊंड (७०मीटर) खेळाडूचे कार्यमान आणि त्यांची शरीरमापे यांचा सहसंबंधआत्मक अभ्यास | डॉ.मनोज रेड्डी व विशाल गायकवाड | 118 |
| 23 | मल्हारराव होळकरांचे माळवा विजयातील योगदान | डॉ.शिवाजी वाघमोडे | 123 |
| 24 | गृहअर्थशास्त्र विषयामध्ये प्रायोगिक पद्धत व प्रदर्शन पद्धत आणि व्याख्यान पद्धत व चर्चा पद्धतीचे तुलनात्मक अध्ययन | डॉ.मृणालिनी वंड | 128 |
| 25 | रामानुजाचार्य व शंकराचार्य यांच्यातील सिद्धांत भेद : एक चिकित्सा | डॉ.संदीप लोंढे | 132 |
| 26 | महाविद्यालयीन ग्रंथालयात मनुष्यबळाचे व्यवस्थापन | डॉ. प्रशांत पगाडे | 137 |
| 27 | भीमसेन देठे यांच्या कादंबऱ्या | डॉ. रेखा वडीखाये आणि शरद मानकर | 141 |
| 28 | स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या पहिल्या नेत्या- सावित्रीबाई फुले | प्रा. संगीता शेळके | 145 |
| 29 | ग. दि. माडगूळकरांचे गीतलेखन | शिल्पा नेवे | 148 |
| 30 | उद्योगमहर्षी लक्ष्मणराव किर्लोस्कर : जगाच्या नकाशावर | श्री. एस. बी. चौगुले | 153 |





Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Multidisciplinary Issue
UGC Approved Journal
Special Issue No. 188 (B)
ISSN : 2348-7143
May- 2019

# नाशिक जिल्ह्यातील १९४७ ते १९६० या कालखंडातील कवी

प्राचार्या डॉ. उज्ज्वला एस. देवरे (मार्गदर्शक)
श्रीमती पुष्पाताई हिरे महिला महाविद्यालय मालेगांव कॅम्प.
संतोष गंगाधर कन्नोर (अभ्यासक)
(संशोधन केंद्र) एच. पी.टी. आर्टस् अँड आर.वाय.के. सायन्स महाविद्यालय, नाशिक
Gmail - santosh8425@gmail.com

**प्रास्ताविक :-**

१९४७ ते १९६० या कालखंडाचा विचार करता कुसुमाग्रज, कवी विनायक दामोदर सावरकर, कवि गोविंद दरेकर, कवी नारायण वामन टिळक, लक्ष्मीबाई टिळक, देवदत्त नारायण टिळक, अशोक देवदत्त टिळक इत्यादी अनेक कविंनी स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात परतंत्र्याच्या झळा सोसल्या त्या नाशिक जिल्ह्यातील पारतंत्र्याच्या काळात जे कवी निर्माण झाले त्या सर्व कवींनी स्वातंत्र्य या एकाच विषयाला केंद्रिभूत करून काव्य निर्माण केले त्यातून समाज जागृतीचे मोठे कार्य त्या काळात वरील कवींनी केले. तसेच या कवितांमधून व्यथा, वेदना पारतंत्र्याच्या भयाने भयभीत झालेली समाजाची व्यथा पहावयास मिळते. काही कवींची भाषा- पारतंत्र्यामुळे बंडखोर होत गेली तर काही कवींची भाषा मृदु होतांना दिसून येते.

**काव्याविषयीचा दृष्टिकोन :-**

कुसुमाग्रजाच्या मते, काव्य हा माणसाचा भोवतालच्या परिसराशी असलेला संवाद होय. आपल्याला उत्कटपणे जाणवलेले दुसऱ्यापर्यंत पोहोचवणे ही माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. काव्यातून हा अनुभव दुसऱ्यापर्यंत पोचतो तेव्हा कवीला मी पण व्यापक झाल्याचे समाधान मिळते म्हणजे त्याचा अहंकार सुखावतो. एकाचा अनुभव अनेकाचा होतो. कुसुमाग्रजांच्या मते. हीच काव्यलेखनाची प्रक्रिया व प्रेरणा होय येथे शब्दांच्या द्वारा कवीचे व्यक्तित्व बाहेर पल्लवीत होते. कवी काव्याच्या साह्याने एक सामाजिक संबंध जोडीत असतो. अशाप्रकारे काव्य म्हणजे अखेरत कवी आणि वाचक यांच्यामधला एक शब्दांकित प्रतिमामय संबंध होय. काव्य हा कवीचा आत्माविष्कार असला तरी आत्माविष्काराची परिणती जेव्हा शब्दांच्या द्वारा होते. तेव्हाच काव्याचा उदय होतो.

कुसुमाग्रज (२७ फेब्रुवारी १९१२- १० मार्च १९९९) हे मराठी भाषेतील अग्रगण्य कवी लेखक, नाटककार व समीक्षक होते. त्यांनी कुसुमाग्रज या टोपणनावाने कवितालेखन केले ते आत्मनिष्ठ व समाजनिष्ठ जाणीव असणारे मराठीतले महत्त्वाचे लेखक मानले जातात. शिरवाडकरांचे वर्णन सरस्वतीच्या मंदिरातील देदीप्यमान रत्न असे करतात.

त्यांचा विशाखा (१९४२ या संग्रहातील तेजस्वी व झळझळीत कवितांचे स्मरण होत असले तरी 'जीवनलहरी' (१९३१) हा त्यांचा पहिला संग्रह आहे. १९४७ नंतर 'किनारा' (१९५२) मध्ये 'मराठी माती' व १९६० मध्ये 'स्वगत' इत्यादी काव्य संग्रह प्रसिध्द झाले. 'विशाखातील' जाणिवांपासून दूर गेली नसली तरी त्यातले ओज आवाहन अन्याया विरूध्द लढा उभारू पाहणाऱ्या त्वेष नंतरच्या काळात फारसा दिसत नाही. स्वातंत्र्योत्तर भारतातील दारिद्रय सामाजिक विषमता आणि मुल्यऱ्हास यांचा निराशाजनक - प्रत्यय या संग्रहात व्यक्त होतो. 'जीवनलहरी' तील चिंतनशील वृत्ती नंतरच्या काळात अधिक गहिरी झालेली दिसते. मानवाच्या जीवनातील दुःखमयतेचा शोध घेतांना ईश्वराच्या अस्तित्वाबरचा विश्वास गाढ होतानाही दिसतो.



Scanned with OKEN Scanner

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013) | May- 2019
Multidisciplinary Issue
UGC Approved Journal | Special Issue No.188 (B)

**कवी विनायक दामोदर सावरकर (जन्म २८ मे १८८३ - २६ फेब्रु १९६६)**

हे भारतीय स्वातंत्र्यसैनिक, मराठी कवी व लेखक होते. भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एका क्रांतिकारक चळवळीचे धुरीण स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर भारतीय राजकारणतील एक महत्वाचे राजकारणी हिंदू संघटक व हिंदुत्वाचे एक विशिष्ट तत्वज्ञान मांडणारे तत्त्वज्ञ विज्ञानाचा पुरस्कार व जातिभेदाला तीव्र विरोध करणारे समाजकारक.

सावरकरांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर ह्या गावी झाला. त्यांचे वडील दामोदरपंत सावरकरांच्या तीन अपत्यांपैकी हे दुसरे होते. वि. दा. सावरकारांना बाबाराव हे मोठे आणि नारायणराव हे धाकटे भाऊ होते. सावरकरांची आई ते नऊ वर्षाचे असतांना वारली. थोरल्या बंधुंच्या पत्नी येसूवहिनी यांनी त्यांचा सांभाळ केला.

सावरकरांच्या कवितांनी मराठी वाड्.मयात राष्ट्रीय विचारांचे नवीन वळण लावण्याची साक्ष त्यांच्या कवितेवरून दिसून येते. सावरकरांची कविता हा मराठी वाङमयाला लाभलेला अमोल ठेवा आहे. १९०९ मध्ये सावरकरांना जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा होणार होती. त्याकाळी अभिनव भारत या संस्थेवर वक्रदृष्टि झाल्यामुळे आपल्याला हिंदुस्थानला परतता येणार नाही व आपण लवकरच पकडले जाऊ असे सावरकरांना वाटले व त्यावेळी समुद्रकाठी गेले असता स्वजनाची आठवण होऊन त्यांनी ही खालील कविता लिहिली.

`ने मजसी परत मातृभूमीला सागरा, प्राण, तळमळला .`

**कवी गोविंद दरेकर (जन्म ९ फेब्रु. १८७४ - २८ फेब्रु १९२६) :-**

कवी गोविंद त्र्यंबक दरेकर हे मुळचे नगर जिल्ह्यातील कन्हेरी पोखरी या खेडेगावचे रहिवाशी. त्यांचे वडील नाशिकमध्ये गवंड्यांचे काम करीत असत. वयाच्या पाचव्या वर्षी पितृछत्र गमावलेल्या गोविंदाना वयाच्या आठव्या नवव्या वर्षीच मोठे दुखणे झाले. त्यातून ते दैवयोगाने वाचले. काही दिवसांनी सावरकर बंधू व गोविंद एकाच ठिकाणी राहू लागले. त्यांच्या प्रेरक शक्तीने मित्रमंडळाची स्थापना झाल्यानंतर लवकरच दरेकरांचा संस्थेत प्रवेश झाला आणि निरनिराळ्या विषयावर ग्रंथ वाचण्याचा त्यांनी सपाटा सुरू केला. मराठी कवींची काव्य विशेषत: मोरोपंतांची काव्य वाचनात आली आणि गणेशोत्सव धार्मिक, पौराणिक घटनांच्या आधारे बाजीप्रभूचा पोवाडा या रचनांसारख `अफजलखानाचा पोवाडा` शिवाजी व मावळे यांचा संवाद यासारखी कवी गोविंदाची काव्ये प्रभाव गाजवू लागली.

गोविंदाच्या कवितेचा अमोल गुणास आकर्षण करणारे दुसरे कारण म्हटले म्हणजे तिचा समग्र संदेश होय. त्यावेळी राष्ट्राच्या मनाला जी एक महान आकांक्षा झुरणी लावीत होती जे एक भय जी एक उत्कट प्रतिज्ञा जो धुमसता राग जो आकसबाज निरूपाय आणि जी विकल नि तरीही अदम्य अशा त्या राष्ट्रीय मनात खळबळ उडवून देत होती. भरत-भूमी स्वतंत्रेचा पण कारागृहांचे भय कोणस अशा किती तरी कविता त्यांनी लिहून चेतना निर्माण करण्याचेच काम केले.

**कवी नारायण वामन टिळक - (जन्म ६ डिसें .१८६१)** - रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यात करजगाव नावाच्या एका लहानशा खेड्यात झाला. टिळक नाशिकमध्ये आल्यावर खरे खरे विदयार्थी बनले. आधी त्यांचे लक्ष संस्कृतकडे वळले व भटजीच्या मठात त्यांनी प्रवेश करून घेतला ह्या ठिकाणी टिळकांची व गणेशशास्त्री लेले ह्यांची गाठ पडली. आईच्या खालोखाल आपल्या काव्य स्फुर्तीचे श्रेय टिळक लेले शास्त्रींना देत त्या वेळची टिळकांची परिस्थिती दिनचर्या वगैरे प्रत्यक्ष पाहणारे लक्ष्मणशास्त्री लेले लिहितात.

नारायणरावांचा मोकळा व प्रेमळ स्वभाव त्यांची कविवृत्ती, शालीनता व विद्याव्यासंग पाहून गणेशशास्त्रींना मोठा आनंद होत असे. टिळक कोणतीही कविता लिहून शास्त्रींना दाखवत व शास्त्री बुवा नारायणरावांचे वारंवार अभिनंदन करीत व मधुन मधुन सुचनाही देत एकदा नारायणरावांनी एक नवी कविता



Scanned with OKEN Scanner

ISSN :
2348-7143
May- 2019

शास्त्रीबुवास दाखविली. ती ऐकताच शास्त्री बुवा फार संतुष्ट झाले व भले नारायण राव असे उद्गार काढले.

टिळकांच्या कवितेची भाषा साधीसुधी असली तरी ती प्रसाद आणि माधुर्य ह्या गुणांनी ओतप्रोत भरलेली आहे. निसर्गावरचे उदंड प्रेम स्त्री बद्दलची उदार दृष्टी, प्रेमभावनेचा आत्मनिष्ठ आविष्कार अशी त्यांच्या काव्याची वैशिष्ट्ये सांगता येतात. केशवसुतांवर 'माझी भार्या' ही कविता लिहिली. 'माझा जन्मभूमीचे नांव' ही भारतविषयीच्या अनन्य प्रेमाने आणि भक्तीने ओथंबून आलेली कविता 'पाखरा येशील कधी परतून' ही बालकवींना उद्देशून केलेली कविता

**लक्ष्मीबाई टिळक :- १ जून १८६६ - २४ फेब्रु. १९३६**

लक्ष्मीबाई टिळक ह्यांच्या आईचे नाव रमाबाई व वडिलांचे नाव नारायण गंगाधर गोखले. लक्ष्मीबाईंचे बालपण त्यांच्या आत्या रखमाबाई गोविंद खांबेटे ह्यांच्या घरी गेले. नारायण वामन टिळक यांच्याशी विवाह झाल्यावर मनकर्णिका हे नांव बदलले गेले आणि लक्ष्मीबाई नारायण टिळक म्हणून त्या ओळखल्या जाऊ लागल्या.

याच काळात लक्ष्मीबाईंनी सामाजिक कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला होता. टिळक धर्मांतर करणार ही बातमी कानावर येताच लक्ष्मीबाई कासावीस झाल्या आणि म्हणे, 'जातो सोडून नाथ माझा आता कवणाला बाहू देवराजा' ही चार ओळीची कविता लिहीली हे बाईचे पहिले काव्य लेखन. लक्ष्मीबाईंच्या कविता टिळक दुरूस्त करत व प्रसिध्दीसाठी पाठवत. लोकांना कवी टिळक परिचित होते. टिळकच पत्नीला कविता लिहून देतात असा काहीसा समज होता. मासिक, मनोरंजन मध्ये प्रसिध्द झालेली 'कारंज्यातला गोंदक' ही कविता वाचून पंढरपुरच्या एका बाईने लक्ष्मीबाईकडे तसा खुलासा मागितला होता.

**अशोक देवदत्त टिळक :-**

प्रेमनाम जगदीश फुला रे काय आणखी सांगू अशांसारख्या टिळकांच्या उक्तींचा व बायबलच्या प्रीतिविषयक शिकवणीचा त्यांच्या मनावर नकळत ठसा उमटला.

'मज माझी भार्या देई। की माता भगिनी दुहीता ही रे' टिळकांची कल्पना अशोकरावांनी अधिक काव्यात्मकतेने व सहृदयतेने उकलून दाखविली आहे. 'कधी ग येशील' ही कविता म्हणजे उदात्त प्रीतिभावनेने ओथंबलेल्या अंतकरणाचे स्पंदनच होय.

पुरूषाच्या सर्व बाजूंनी उफाळणाऱ्या आकाक्षांना सर्व प्रकारे सावरून धरणाऱ्या स्त्रीत्वाचे सम्यक दर्शन 'माया' ह्या कवितेत घडविलेले आहे. पुरूषाला स्त्रीची आवश्यकता आहे. ती केवळ वासनापुर्तीसाठीच नव्हे. त्यांच्या जीवनाच्या प्रत्येक पैलुमध्ये ती त्याची सहचारिणी रास्त अर्थाने अर्धांगीनी असते. स्त्रीला माया म्हणायचे खरे परंतु त्या मायेचे स्वरूप कोणते ते कविने येथे दाखविले आहे.

**देवदत्त नारायण टिळक :-**

देवदत्ताची कविता प्रसिध्द आहे. दत्त कवींच्या किंवा ओघ सजिव रजताचा का चरणचा अर्थ आईने पाण्याचा ओघळ सांगितला तेव्हा निहायत खुश झाले होते. रसज्ञतेएवढीच त्यांची कवित्व शक्तीही एखादया वेळी स्वयंसिध्द ठरत असे. नाशिकच्या आई मिस हार्वे वारल्या तेव्हाची शरणपुरच्या चर्चमध्ये त्यांच्या नावाचा फलक लावायचे ठरले. त्यासाठी एक श्लोक लिहून देण्याचे कबुल केले होते. पण आपल्या स्वभावानुसार ते ही गोष्ट विसरून गेले.

अगदी लहान मुलांसाठी कथा कवितांचा ओघच बालबोध मधून त्यांनी कैक वर्ष चालविला होता. बालवाङमय, कुमारसाहित्य, शिशुगीते, बडबडगीते इ. शब्द त्या काळी नव्हते. लहान मुलांसाठी वाङमय मात्र होते. त्यांच्या काळातल्या हातांच्या बोटावर मोजण्याइतक्या बालवाङमय प्रकारात त्यांची प्रामुख्याने गणना करावी लागते.

**समारोप :-**

कवी विनायक दामोदर सावरकर यांनी पारतंत्र्यात भारत देश असतांना अनेक कविता त्यांनी लिहिल्या व १९०९ मध्ये जेव्हा त्यांना जन्मठेप, काळ्या पाण्याची शिक्षा ठोठावली तेव्हा त्यांना आपल्या मातृभूमीबद्दल ओढ निर्माण झाली आणि त्यांवेळेस ने मजसी ने परत मातृभूमीला। सागरा प्राण तळमळला ही भारतमातेविषयी कविता त्यांनी लिहिली. तसेच कवी गोविंद दरेकर यांचा सहभाग अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. महाराष्ट्रात पारतंत्र्याच्या काळात जे कवी निर्माण झाले त्यात दरेकरांचे नाव सावरककरांच्या नंतर घ्यावे लागते. त्याच काळात कवी नारायण वामन टिळक यांना गणेश शास्त्री यांची साथ लाभल्याने त्यांच्याच घरी राहून त्यांनी कवित्व लेखन केले. टिळकांच्या कवितेंची भाषा साधी, सरळ असली तरी ती प्रसाद आणि माधुर्य ह्या गुणांनी ओतप्रोत भरलेली आहे. निसर्गावरचे व स्त्रियांबद्दलचा आदरभाव त्यांच्या कवितेमध्ये दिसून येतो. त्यांच्या जोडीने लक्ष्मीबाई टिळक यांनीही त्याचकाळात सामाजिक कादंबरी बरोबरच कवितेचेही लिखाण केले. त्याचकाळात अशोक देवदत्त टिळक यांनाही काव्यात्मकतेने व सहृदयतेने त्यांची कवितेची कल्पना उकलून दाखविली. पुरूषांच्या सर्वबाजूंनी उफाळणाऱ्या आकाक्षांना सर्वप्रकारे सावरून धरणाऱ्या स्त्रीत्वाचे सम्यक दर्शन त्यांच्या 'माया' ह्या कवितेत दिसते. त्यांच्यानंतर देवदत्त नारायण टिळक यांनीही बालवाङमय, कुमारसाहित्य, शिशुगीते, बडबडगीते इत्यादी साहित्य लहान मुलांसाठी त्यांनी लिहिली.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. मायदेव वासुदेव गोविंद (संपा) 'सावरकराची कविता', अक्षरमुद्रा प्रका. नाशिक, प्रथम आ. १९४७.
२. रहाळकर भरद्वाज - 'कविता गोविंदांची', अक्षरमुद्रा प्रकाशन, नाशिक प्रथम आ. १९४७.
३. टिळक देवदत्त नारायण (संपा) - 'वनवासी फुल' - नाग विदर्भ प्रकाशन अमरावती प्रथम आ. १९६२
४. देव अशोक - 'लहरी' - ध्रुव देवदत्त टिळक प्रकाशन, नाशिक प्रथम आ. १९५२
५. टिळक देवदत्त अशोक - 'देवदत्तांची कविता' - टिळक प्रकाशन, नाशिक



Scanned with OKEN Scanner